# प्रेस नोट

## विमानतळ पोलीस स्टेशनकडून घर फोडीचे ५ गुन्हे उघडकीस

विमानतळ पोलीस स्टेशन हददीत वाढत्या घर फोडीचे प्रकार लक्षात घेवून मा. डी.सी.पी. साकोरे, सहा.पो.आयुक्त वसंत तांबे यांचे मार्गदर्शनाखाली विशेष पथक स्थापन करुन तपास करणेचे असदेश दिले होते. त्यानुसार मा. व.पो.नि. श्री.संजय नाईकपाटील व पोलीस निरीक्षक गुन्हे श्री.विलास सोंडे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पो.कर्मचारी विश्वनाथ गोणे व संजय आढारी ,विमाननगर परिसरात रात्री ग्रस्त करीत असताना एक इसम संशईतरित्या मिळून आला त्याचेकडे अधिक चौकशी चौकशी केली असता त्याच्याकडे घर फोडीचे चार गुन्हे केल्याचे कबुल केले.

यामध्ये आरोपी नामे १) छवेंद्रकुमार बरमुलाल मरावी वय २४ मुळ रा. शिवणी , मध्यप्रदेश सध्या रा. लेबर कॅम्प विमाननगर याने अधिक तपासामध्ये विमाननगर येथील रोहन मिथिला या सोसायटीत चार घर फोडीचे गुन्हे केल्याचे कबुल केले. सदर आरोपीने गेले ७ महिन्यात केलेल्या घर फोडीचे गुन्हयांमधिल दोन लॅपटॉप,एक फ्रिज, ३ एलईडी टीव्ही, ४ गॅस सिलेंडर , व्हिडीओगेम, ५ मोबाईल हॅन्डसेट , एक स्पिकर असा एकुण किं. रु.४,३७,०००/- चा मुददेमाल हस्तगत करणेत आला आहे. सदर आरोपीकडून आणखी घर फोडीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता विमानतळ पोलीसांनी वर्तविली आहे. आरोपीस १८ ऑगस्ट पर्यंत पोलीस कस्टडीमध्ये ठेवण्याचे आदेश मा. न्यायालयाने दिले आहेत. गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संजय नाईक पाटील व पोलीस निरीक्षक श्री विलास सोंडे यांचे मार्गदर्शनखाली सपोनि. एम.आर. खोकले व त्याचे पथकातील पोलीस कर्मचारी विजय सावंत, विश्वनाथ गोणे,संजय आढारी , करीत आहेत.

# प्रेस नोट

## गांजा विक्री करणारे इसमास गांजा व रोख रकमेसह विमानतळ पोलीस स्टेशनकडुन अटक

दिनांक १४/८/१७ रोजी पो कॉ  हारुण पठाण यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, सिम्बायोसिस कॉलेज समोर विमाननगर पुणे या ठिकाणी एक इसम गांजा विक्री करणेसाठी येणार आहे. त्या प्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संजय नाईक पाटील व पोलीस निरीक्षक श्री विलास सोंडे यांचे मार्गदर्शनखाली टीम तयार करुन सिम्बायोसिस कॉलेज येथे सापळा रचला असता मिळालेल्या बातमीतील संशयीत इसम सिम्बायोसिस कॉलेज समोर आल्याची खात्री झाल्याने त्यास ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याने त्याचे नाव उमाकांत रामसिरोमड मिश्रा वय २३ वर्षे रा. मरहा तालुका मेजा जिल्हा इलाहाबाद उत्तरप्रदेश राज्य, सध्या रा. साईनाथ नगर रोड, सुंदरबाई शाळेच्या बाजुला, चंदननगर पुणे असे असल्याचे सांगितले. त्याचे जवळील स्कुटरला लावण्यात आलेल्या मोठया पिशवीची तपासणी केली असता त्या मध्ये ७७५ ग्रॅम गांजा आढळुन आल्याने त्यास त्याची ज्युपीटर स्कुटर नंबर एम एच १२ एन सी ४८९२ सह ताब्यात घेण्यात आले. त्याचे विरुध्द सहा पोलीस निरीक्षक श्री खोकले यांनी तक्रार दिले नंतर विमानतळ पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

आरोपीकडे तपास केला असता त्याचे घर झडती मध्ये रोख रक्कम ४,०४,५००/- रुपये रोख स्वरुपात मिळुन आली असुन वाघोली येथील स्टेट बॅंक ऑफ इंडिया शाखेमध्ये ७,५०,०००/- रुपये शिल्लक असल्याचे आढळुन आले आहे. आरोपीची १८/८/२०१७ रोजी पर्यंत पोलीस कस्टडीची रिमांड घेण्यात आलेली आहे. मा पोलीस उप आयुक्त परिमंडळ ४ श्री दिपक साकोरे व सहा पोलीस आयुक्त श्री वसंत तांबे यांचे मार्गदर्शनखाली पुढील तपास सहा पोलीस निरीक्षक श्री प्रताप कोलते हे करीत आहेत.